पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६७**

(सभावृत्तांत)

दिनांक – १३/०६/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १३/०६/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा.गीता सुशिल मंचरकर
११. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१२. मा.लांडगे सारिका संतोष
१३. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५. मा.बारणे अर्चना तानाजी
१६. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१), मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोझकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य

लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण - सहशहर अभियंता, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.राऊत, मा.बोदडे, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.पवार, मा.देशमुख, मा.धानोरकर, मा.सेठीया - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.आगळे, मा.लटपटे – प्रशा.अधिकारी, मा. ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.चारटणकर - सहव्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२७) मा.स्थायी समिती सभा आयोजना बाबत.- मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२८) कै.सदाशिव बहिरवडे क्रीडांगण सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत. – मा.राजेंद्र गावडे, मा. सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) प्रभाग क्र.१९ (नविन प्रभाग क्र.१६) मधील वाल्हेकरवाडी परिसरात नाला बांधणे व अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्र.३०) प्रभाग क्र.२१ मध्ये ठिकठिकाणी नाले बांधणेबाबत.

विषय क्र.३१) पंतप्रधान आवास योजने अंतर्गत मौजे च-होली येथील नविन स.नं.४०८ पै, ४०९ पै (आरक्षण क्र.२/८३) येथे अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणे प्रकल्पास महारेराची रजिस्ट्रेशन फी अदा करणेबाबत.

विषय क्र.३२) खाजगी विद्यालयांमधील इयत्ता १० वी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण मिळविलेले दारिद्र्य रेषेखालील गुणवंत विद्यार्थांना बक्षीस रक्कम देणेबाबत. - मा.सागर आंगोळकर, मा.विलास मेडिगेरी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) उड्डाणपुल तसेच महापालिकेच्या मिळकतींवर अनाधिकृतपणे चिटकवण्यात येणा-या जाहिरातींवर कारवाई करणेबाबत. - मा.विलास मेडिगेरी, मा.यशोदा बोईनवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५४७ दि.११/४/२०१८ मध्ये दुरूस्तीबाबत. - मा.सागर आंगोळकर, मा.विलास मेडिगेरी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) नविन गृह प्रकल्पांना (स्कीम) बांधकाम परवाना विभागाकडील नविन परवाना बाबत. - मा.विलास मेडिगेरी, मा.सागर आंगोळकर, यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना शालेय साहित्य देणेबाबत – मा. राजेंद्र गावडे, मा. नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) मा.पोलिस आयुक्त पुणे यांचे मागणीनुसार पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्त कार्यालयाकरिता मनपाच्या मालकीची चिंचवड येथील स.नं.१६५ व १६६ सि.स.नं.३२५० मधील आ.क्र.१९४ प्रेमलोक पार्क शाळा इमारत नियमानुसार भाड्याने देणेबाबत.

---------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

राष्ट्रसंत दर्जा प्राप्त झालेले आध्यात्मिक गुरू भैय्यूजी महाराज यांचे दि. १२/६/२०१८ रोजी दु:खद निधन झाले असल्याने तसेच महाराष्ट्र राज्याचे विद्यमान कॅबीनेट कृषीमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते व माजी प्रदेशाध्यक्षमा.ना.पांडुरंग उर्फ भाऊसाहेब फुंडकर यांचे दि.३१/५/२०१८ रोजी दु:खद निधन झाले असून त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

(महापालिकेत मुख्य लेखापरिक्षक पदावर नव्याने रूजू झालेले मा. कुंभोजकर, मुख्य लेखा परिक्षक यांचे स्वागत करून मा. सभापती, स्थायी समिती यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच मा.स्थायी समितीच्या सभापती मा.ममता गायकवाड यांनी शालांत परिक्षेत प्राप्त केलेल्या यशा बाबत मा.आयुक्त सो. यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.)

----------

दिनांक ०६/०६/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक -२७७१ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान विभाग
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मातंवि/६/कावि/१७२/२०१८ दि.०७/०५/२०१८

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये NIC यांचेकडील ई-निविदा (e-Procurement) संगणक प्रणालीचे यशस्वीपणे अंमलबजावणी बाबत.

विषय क्रमांक ०१ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७२ विषय क्रमांक - ०२
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.अक्षेका/स्था/कावि/५७७/२०१८ दि.१५/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील जुना जी बी हॉल येथे स्लॅब टाकणे प्रस्तावित आहे. सदर कामासाठी प्रकल्प आराखडा करणे बांधकाम परवानगी घेणे, स्ट्रक्चरल डिझाईन तयार करणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरचे नियोजित स्लॅब बांधणेसाठी व त्या अनुषंगाने इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामाचे नियोजन, संकल्प चित्रे, प्रकल्प आराखडे, बांधकाम परवानगी, पुर्वगणनपत्रक, निविदा इ. तयार करणेकरीता तज्ञ वास्तुविशारद (Architect) व निविदा पश्चात कामे करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करणे आवश्यक आहे. मनपा पॅनलवरील मे. के. बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी मनपा मुख्य इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले आहे. तसेच त्यांना आर्किटेक्ट, स्ट्रक्चरल व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचा अनुभव आहे. तसेच ते मनपाच्या प्रचलित दरानुसार विषयांकित काम करणेस तयार आहेत. तरी मे. के. बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचे प्रकल्प कामाचा पुर्वानुभव व कौशल्य लक्षात घेता पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील जुना जी बी हॉल येथे स्लॅब टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या प्रकल्पासाठी त्यांची वास्तुविशारद (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करणेचे प्रयोजन आहे.तरी पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये जुना जी.बी. हॉलवर स्लॅब टाकणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे या प्रकल्पासाठी मे. के. बी.पी. सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांना मनपाचे प्रचलित दराप्रमाणे वास्तुविशारद (Architect) म्हणुन निविदा रक्कम रुपये ५० लाखाच्या पुढे २% फी अदा करणेकामी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC)

म्हणुन सदर कामासाठी निविदा रकमेच्या २.७५% अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७३ विषय क्रमांक - ०३

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग–मध्यवर्ती साहित्य भांडार(वैद्यकिय)

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/१२४/२०१८ दि.१६/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रूग्णालयामध्ये हेल्थ कार्ड मॅनेंजमेंट सिस्टिम राबविणेकामी निविदा क्रं.१४/२००८-०९ राबविण्यात आलेली होती. निविदेमधील लघुत्तम निविदाकार मे.अमृता टेक्नॉलॉजी यांना त्याच्या प्राप्त झालेल्या दरास मा.आयुक्त सो. यांची मान्यता घेवून हेल्थ कार्ड मॅनेंजमेंट सिस्टिम उभारणेत आलेली आहे. वाय सी एम एच येथील २०,००० हेल्थ कार्डचा पुरवठा दि.१९/०२/२०१८ रोजी संपलेला असल्याने वाय सी एम एच येथे रूग्णाना हेल्थ कार्ड उपलब्ध करून देणेकामी नव्याने करारनामा न करता दि.१९/०२/२०१८ पासून प्रति दिन अंदाजे ३०० कार्ड प्रमाणे कार्ड खरेदी करणेकामी अंदाजे सहा माहिने करिता म्हणजेच दि.१८ ऑगस्ट २०१८ पर्यंत १८० दिवसाकरिता १८० X ३०० कार्ड ५४,००० कार्ड घेणेकामी प्रति कार्ड र.र.१५/- प्रमाणे अंदाजित खर्च र.रू.८,१०,०००/- इतका होणार आहे. याकामी मागील करारनाम्यास अधिन राहून आवश्यक अंदाजित खर्चास एकूण र.रू.८,१०,०००/- (अक्षरी र.रु.आठ लाख, दहा हजार फक्त) व कार्ड कमी जास्त झालेस त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७४ विषय क्रमांक - ०४

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग– औ.प्र.संस्था (मुलींची) कासारवाडी

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.औप्रसंमु/०१/कावि/११०/२०१८ दि.२४/०५/२०१८

विषय - औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी येथे एकत्रित मानधनावर निदेशक फेरनियुक्ती बाबत.

विषय क्र.४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७५ विषय क्रमांक - ०५
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/क-मुख्य/११७/२०१८ दि.०१/०६/२०१८

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.101/1/2017-18 अन्वये प्रभाग क्र.८ इंद्रायणीनगर मध्ये ठिकठिकाणी चौकामध्ये म्युरल्स बसविणे व सुशोभिकरणाची कामे करणेकामी मे.एस.बी.सवई नि.र.रू.66,03,534/- (अक्षरी रक्कम रुपये सहासष्ठ लाख तीन हजार पाचशे चौतीस फक्त) पेक्षा 12.01% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.58,10,450/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७६ विषय क्रमांक - ०६
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – उद्यान विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/६७६/२०१८ दि.३१/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाचे उद्यान विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ४) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी/शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागु असल्यास भाववाढ कलमानुसार देखभाल कामासाठी निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन संबधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन आदेश निर्गत केलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७७ विषय क्रमांक - ०७
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/१०४/२०१८ दि.०४/०६/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२१/०५/२०१८ ते दि.२७/०५/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१०४/२०१८ दि.०४/०६/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७८ विषय क्रमांक - ०८

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जा.क्र.YCMH/भांडार/२/कावि/२८४/२०१८ दि.०१/०६/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांची शिफारस विचारात घेऊन –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या नेत्ररोग ओटी विभागाने त्यांचेकडील ऑप्टिकॉन कंपनीच्या फॅको मशीन करिता ०१ नग हॅण्डपीसची मागणी केली होती. त्यानुसार उत्पादित कंपनीचे अधिकृत वितरक मे.टेक्नो व्हिजन इंडिया प्रा.लि., मुंबई यांनी एकूण र.रु.२,५७,६००/- चे दरपत्रक सादर केले होते. सदरचे दरपत्रक स्विकृत करणेत आलेले असुन त्यानुसार त्यांना हॅण्डपीसचा पुरवठा आदेश निर्गत करणे आवश्यक आहे. सबब निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने उत्पादित कंपनीचे अधिकृत वितरक मे.टेक्नो व्हिजन इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून नेत्ररोग ओटी विभागासाठी आवश्यक ०१ नग हॅण्डपीस खरेदी करणेस व सदर हॅण्डपीस खरेदी करणेकामी एकूण र.रु.२,५७,६००/- (अक्षरी र.रू. दोन लाख सत्तावण्ण हजार सहाशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७७९ विषय क्रमांक - ०९

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जा.क्र.YCMH/भांडार/२/कावि/२८३/२०१८ दि.०१/०६/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या प्रयोगशाळा विभागाच्या मागणीनुसार त्यांचे विभागातील TB Culture System Model - MGIT960 या उपकरणाचे CMC करणेकामी संबंधित उत्पादित कंपनी M/s.Becton Dickinson India Private Limited, Gurgaon यांनी दर कमी करुन सादर केलेले र.रु.३,१३,८८०/- (अक्षरी र.रु.तीन लाख तेरा हजार आठशे ऐं शीफक्त)

चे दरपत्रक स्विकृत करणेत आले आहे. त्यानुसार प्रयोगशाळा विभागातील TB Culture System - Model - MGIT960 चे CMC संबंधित उत्पादित कंपनी M/s.Becton Dickinson India Private Limited, Gurgaon यांचेकडून निविदा न मागविता, करारनामा करुन थेट पध्दतीने करणेस व सदर CMC करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.३,१३,८८०/-(अक्षरी र.रु.तीन लाख तेरा हजार आठशे ऐंशी फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८० | विषय क्रमांक - १०

दिनांक – १३/०६/२०१८ | विभाग–नागरवस्ती विकास योजना विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी | अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/०६/कावि/२५५/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता इ.१० वी व १२ वी मधील ८०% पेक्षा जास्त गुण संपादन केल्याला विद्यार्थ्यांना बक्षीस रक्कम देणेकामी जाहीर प्रकटनाद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार एकुण ५०५९ अर्ज प्राप्त झाले असून त्या अर्जाची तपासणी केली असता योजनेच्या अटी व शर्ती नुसार एकूण ४४८४ अर्ज पात्र झाले आहेत. व एकुण ५७५ अर्ज अपात्र झाले आहेत. मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१२३२ दिनांक २९/११/२०१७ अन्वये मान्यता घेऊन एकुण ४४८४ पात्र लाभार्थींना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात लाभ देण्यात आला आहे. उर्वरित अपात्र अर्जापैकी कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर पात्र ठरणा-या विद्यार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. एकुण ५७५ अपात्र अर्जापैकी २७४ अर्जदारांनी कागदपत्रांची पुर्तता केली आहे. योजनेच्या मंजूर धोरणाप्रमाणे या पात्र अर्जदारांना खालील प्रमाणे बक्षीस रक्कम देणे आवश्यक आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. इ.१० वी 80% ते 90% गुण संपादन | 173 | * 10000 | = | 17,30,000/- |
| २. इ.१० वी 90% पेक्षा जास्त गुण संपादन | 75 | * 15000 | = | 11,25,000/- |
| ३. इ.१२ वी 80% पेक्षा जास्त गुण संपादन | 26 | * 15000 | = | 3,90,000/- |
| एकुण पात्र लाभार्थी | 274 | | एकुण | र.रू.32,45,000/- |

वरील प्रमाणे एकूण २७४ पात्र विद्यार्थ्यांना लाभ देणेकामी एकूण र.रू.३२,४५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये बत्तीस लाख पंच्चेचाळीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०१८-१९ चा वित्तीय वर्षात "इ.१० वी व १२ वी मधील ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करणा-या विद्यार्थ्यांना बक्षीस रक्कम देणेबाबत" या उपलेखाशिर्षावर र.रू.७,५०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आली असुन त्यामधून सदरचा खर्च करणेत येईल. तरी सदरच्या २७४ पात्र विद्यार्थ्यांना लाभ देणेकामी र.रू.३२,४५,०००/-(अक्षरी र.रू.बत्तीस लाख पंच्चेचाळीस हजार फक्त) चे खर्चास तसेच अपात्र

अर्जापैकी कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर पात्र ठरणा-या अर्जदार विद्यार्थ्यांना लाभ देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८१ विषय क्रमांक - ११

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/३/कावि/१७७/२०१८ दि.०५/०६/२०१८

विषय - पीएमपीएमएल संस्थेस संचलनतूट व विविध प्रकारचे पासेसपोटी जून २०१८ ची रक्कम अदा करणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८२ विषय क्रमांक - १२

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – माहिती व जनसंपर्क विभाग

सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माजसं/४/कावि/१७६/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिककेच्या विविध विभागाकडील मागणीनुसार विविध कार्यक्रमांचे फ्लेक्स छपाई, पॉकेटींग व लोखंडी फ्रेमवर लावणेचे कामासाठी निविदा नो.क्र.१/३/२०१७-१८, दि.१३/११/२०१७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये मे.ड्रु व्हिजन ग्राफीक्स यांचे फ्लेक्स छपाईसाठी दर र.रु.१०/-प्रती स्केअर फुट (निविदा दरापेक्षा २८.५७ टक्के कमी) व फ्लेक्स छपाई व पॉकेटींग करणेसाठी दर र.रु.१२/-प्रती स्केअर फुट (निविदा दरापेक्षा २५ टक्के कमी) तसेच फ्लेक्स छपाई करुन लोखंडी फ्रेमवर लावणेसाठी दर र.रु.१०/-प्रती स्केअर फुट (निविदा दरापेक्षा २८.५७ टक्के कमी) असे प्राप्त झाले आहेत. कामकाज करुन घेणेबाबत त्यांचेबरोबर दि.३१/०१/२०१८ रोजी १ वर्ष कालावधीसाठी करारनामा करण्यात आलेला आहे. कामकाजाच्या अनुषंगाने फ्लेक्स छपाई, पॉकेटींग व लोखंडी फ्रेमवर लावणेचे कामाकरीता अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.८,००,०००/- करण्यात आली असून त्यास अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८३ विषय क्रमांक - १३

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – माहिती व जनसंपर्क विभाग

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माजस/४/कावि/१७८/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिककेच्या विविध विभागाकडील मागणीनुसार अनधिकृत बांधकाम कारवाई, महोत्सव, सत्कार, समारंभ, जयंती, अनधिकृत बांधकाम, करसंकलन व पवनाथडी, स्वरसागर संगीत महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचे व्हिडीओ शुटींग करणेबाबत निविदा नो.क्र.१/१/२०१७-१८, दि.१३/११/२०१७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये व्हिडीओ शुटींगसाठी मे.दर्शन डिजीटल व्हिडीओग्राफी, सांगवी यांचे दर र.रु.१,८००/- पहिल्या तासासाठी व पुढील प्रत्येक तासासाठी र.रु.९००/- या प्रमाणे निविदा रकमेच्या १० टक्के कमी असे प्राप्त झाले आहेत. कामकाज करुन घेणेबाबत त्यांचेबरोबर दि.३१/०१/२०१८ रोजी १ वर्ष कालावधीसाठी करारनामा करण्यात आलेला आहे. कामकाजाच्या अनुषंगाने व्हिडीओ शुटींगसाठी अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.६,००,०००/- (अक्षरी र.रू. सहा लाख फक्त) करण्यात आली असून त्यास अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८४ विषय क्रमांक - १४

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – माहिती व जनसंपर्क विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माजसं/४/कावि/१७७/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिककेच्या विविध विभागाकडील मागणीनुसार पवनाथडी, स्वरसागर संगीत महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचे एल.ई.डी. स्क्रीनसाठी निविदा नो.क्र.१/२/२०१७-१८, दि.१३/११/२०१७ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये एल.ई.डी. स्क्रीनसाठी मे.रामा व्हिजन, थेरगांव यांचे इनडोअरसाठी स्टेज ऑपरेटरसह दर र.रु.१४७/-प्रती स्केअर फुट (निविदा दरापेक्षा ४३.४६ टक्के कमी) तर आउट डोअर साठी स्टेज ऑपरेटर सह र.रु.१४२/- (निविदा दरापेक्षा ६०.५५ टक्के कमी) असे प्राप्त झाले आहेत. कामकाज करुन घेणेबाबत त्यांचेबरोबर दि.३१/०१/२०१८ रोजी १ वर्ष कालावधीसाठी करारनामा करण्यात आलेला आहे. कामकाजाच्या अनुषंगाने एल.ई.डी. स्क्रीनसाठी अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.७,००,०००/- (अक्षरी र.रू. सात लाख फक्त) करण्यात आली असून त्यास अथवा येणा-या

प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८५ विषय क्रमांक - १५

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – पाणीपुरवठा विभाग

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६/कावि/१३७७/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१७/१८/२०१७-१८ अन्वये सन २०१७-१८ करिता जलक्षेत्र क्र.ड/१२ मधील कवडेनगर, काटेपुरम इ. परिसरात जुन्या पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकणेकामी मे.जय गणेश एंटरप्रायझेस निविदा रक्कम रू.३०,८०,८४१/- (अक्षरी र.रू.तीस लाख ऐंशी हजार आठशे एकेचाळीस फक्त) पेक्षा ११.१२% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२७,३८,२५१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८६ विषय क्रमांक - १६

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/आ१५/कावि/२६७/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांची शिफारस विचारात घेऊन –

प्रस्तावात नमूद प्रमाणे निविदा नोटीस क्र.१/२०१८-२०१९ साठी ३ प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.जनविकास स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था -१५% कमी दराची असुन त्यांना दर कमी करणे करिता दिलेल्या पत्रानुसार सदर संस्था -१६% या कमी दराने कामकाज करणेस तयार असल्याचे त्यांनी दि.३०/०५/२०१८ चे पत्राने तयारी दर्शविली आहे. त्यानुसार निविदा र.रु.९,९७,७४०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख सत्याण्णव हजार सातशे चाळीस फक्त) पेक्षा -१६% कमी या दराने आलेली निविदा सर्वात कमी दराची असल्याने स्विकारणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.३०/०५/२०१८ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.जनविकास स्वयं.रोजगार सेवा सहकारी संस्था यांचे कडून आदेश दिले पासुन १५ दिवसांपर्यत काम करून

घेणेत येणार असलेने र.रू.९,९७,७४०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८७ विषय क्रमांक - १७
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – सुरक्षा विभाग
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे जा.क्र.सुवि/२/कावि/१५८/२०१८ दि.०६/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाकडील सुरक्षा अधिकारी यांचे वापरातील वाहन क्रं.एम.एच.१४ सी.एल.००१८ च्या वाहनाची टायरची धाव ४१,४०१ (कि.मी.) झाले असून ते खराब झालेले मा. आयुक्त यांचे मभां/१८/कावि/१७/२०१२ दिनांक ०५/११/२०१२ अन्वये टायर खरेदी चे धोरण व टायर खरेदी बाबत कार्यशाळा विभागाचे अभिप्राया नुसार ०४ टयुबलेस टायर खरेदी करणेकामी कोटेशन मागविणेत आले असता त्यापैकी मे.दर्शन टायर्स चिंचवड पुणे यांचे ०४ नग टायर साठी ३,५५०/- प्रमाणे १४,२००/-+३५०/- (Bal + Alignment) असे एकूण १४,५५०/- (अक्षरी र.रू. चौदा हजार पाचशे पन्नास फक्त) असे सगळयात कमी दराने एजन्सी कडून निविदा न मागविता करारनामा न करता थेट पध्दतीने टायर खरेदी करणेत आलेले असून त्यापोटी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७८८ विषय क्रमांक - १८
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. स्था/EWSप्र/३८८/२०१८ दि.०८/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र राज्य संपदा (विनिमय व विकास) कायदा, २०१६ (महारेरा) अंतर्गत ५०० चौ.मी. पेक्षा अधिक किंवा ८ पेक्षा जास्त सदनिका असणा-या प्रकल्पांना महारेरा कायद्याच्या अंतर्गत नोंदणी करणे गरजेचे आहे. सदर कायदा १ मे २०१७ रोजी महाराष्ट्र राज्यात लागू झालेला आहे. महारेरा अंतर्गत प्रवर्तकांनी प्रकल्पाची नोंदणी करणे व कायद्यात नमुद केलेल्या नियम व अटी नुसार प्रकल्पाचे पालन करणे गरजेचे आहे.

महारेरा कायद्या अंतर्गत विशिष्ट प्रकारची कामे करावी लागणार आहेत. त्यांची यादी खालीलप्रमाणे.

1. प्रकल्पांची महारेरा नोंदणी करणे.
2. प्रकल्पनिहाय लेखापुस्तके तयार करुन ताळेबंद तयार करणे.
3. प्रकल्पांची चालू स्थितीची माहिती प्रति तीन महिन्यात महारेराला सादर करणे.
4. प्रकल्पाचे महारेरा नुसार लेखापरीक्षण करणे आणि
5. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महारेरा विषयक सल्ला घेणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबवत असते. सदर प्रकल्पांमधील सदनिकांची संख्या ८ पेक्षा जास्त असून तसेच भूभाग ५०० चौ.मी. पेक्षा जास्त असल्याने प्रकल्पास महारेरा कायदा लागू होत असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर कायद्याची अंमलबजावणी महापालिकेत प्रथमच होणार असल्याने व सदरचे काम हे एक विशिष्ट प्रकारचे असल्याने या कायद्याची योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. कायद्याची अंमलबजावणी न केल्यास प्रकल्प खर्चाच्या १०% पर्यंत दंडाची तरतुद कायद्यात असल्याने सदर कामाकरिता माहितीगार सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे आवश्यक वाटत आहे.सदरचे काम करण्यासाठी सनदी लेखापाल यांना किती फी अदा करावी व बाबतचे दर उपलब्ध नसल्याने तसेच अशा प्रकारचे समांतर काम यापुर्वी मनपात करुन घेतले नसल्याने कामाची व्याप्ती व खर्च याचा अंदाज घेणेसाठी विभागांतर्गत ऑनलाईन कोटेशन नोटीस २/२०१८ दि.०७/०४/२०१८ रोजी च-होली प्रकल्पाकरिता प्रकल्प कालावधीसाठी (२.५ वर्षे) प्रसिध्द करुन कोटेशन मागविली आहेत. त्यात मे.प्रास अँण्ड असोसिएटस् एलएल.पी. (सी.ए.) यांचा लघुत्तम दर (L1) प्राप्त झाला आहे. मे.प्रास अँण्ड असोसिएटस् एलएल.पी. (सी.ए.) यांना दर कमी करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी र.रु.४,४०,०००/- असा दर (कमी केलेला) दिला आहे. मे.प्रास अँण्ड असोसिएटस् एलएल.पी. (सी.ए.) यांनी सदर काम महापालिका भवन या ठिकाणी येऊन करण्याचे मान्य केले आहे. तसेच र.रु.४,४०,०००/- प्रति प्रकल्पाकरिता या व्यतिरिक्त कोणतीही रक्कम देय राहणार नसून महारेरा कायद्यांतर्गत भरावी लागणारी विविध शासकीय शुल्क/ फी व अन्य रक्कम महानगरपालिका थेट अदा करेल. सदरचे काम हे प्रकल्पाचे सुरुवातीपासून संपेपर्यंत सनदी लेखापाल (सी.ए.) मार्फत करावयाचे आहे. कामाचे विशेष स्वरुप पाहता व कालमर्यादा असल्याने तसेच मे.प्रास अँण्ड असोसिएटस् एलएल.पी. (सी.ए.) यांचा रेरा कामकाजाचा अनुभव लक्षात घेवून आणि कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) नुसार या प्रकल्पास व या सारख्या पुढील सर्व PMAY प्रकल्पास रेरा विषयक कामकाज करणेकामी सल्लागार म्हणून मे.प्रास अँण्ड असोसिएटस् एल.एल.पी. (सी.ए.) यांची नेमणूक करणेसाठी थेट पध्दतीने (निविदा प्रसिध्द न करता), करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२७८९ विषय क्रमांक - १९
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – ह क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.क्षेत्रीय कार्यालय यांचे जा.क्र.हक्षे/३/कावि/१९८/२०१८ दि.०२/०६/२०१८

मा.क्षेत्रीय कार्यालय यांची शिफारस विचारात घेऊन –

ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील पावसाळी गटर्स चेंबर्स खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करुन मोशी कचरा डेपोत खाली करुन पसरुन देणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे निविदा नोटीस क्र.१/२०१८-२०१९ साठी ३ प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था पत्ता - दापोडी पुणे १२ यांनी -२४.७०% कमी दराने काम करण्यास मान्यता दर्शविलेली आहे. या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या र.रू.६,६९,४३८/- पेक्षा -२४.७०% कमी या दराने आलेली निविदा सर्वात कमी दरांची असल्याने स्विकारणेबाबत मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.३०/०५/२०१८ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली असून कामाचा आदेश निर्गत करण्यात आलेला आहे. त्यानुसार श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांचेकडून निविदा मंजूर र.रू.५,०४,०८६.८१ (अक्षरी र.रू.पाच लाख चार हजार शहाऐंशी आणि एक्याऐंशी पैसे फक्त) पर्यंत काम करून घेणेकामी आदेश निर्गत केलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९० विषय क्रमांक - २०
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र, से.२३
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/१९२/२०१८ दि.०७/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका जलशुध्दीकरण केंद्र से.क्र.२३ येथे पाणी शुध्दीकरण प्रक्रियेसाठी द्रवरुप स्वरुपातील पॉली अल्युमिनियम क्लोराईड व पावडर स्वरुपातील पॉली अल्युमिनियम क्लोराईड पुरविणे या कामाचा आदेश प्रस्तावात नमूद संदर्भ क्र.२,३ अन्वये देण्यात आला आहे. सदर निविदेत मे. एस.व्ही.एस. केमिकल्स कार्पोरेशन व मे. आयडियल केमिकल्स (इं)प्रा.लि. यांना अनुकमे ६०% व ४०% प्रमाणे परिमाण पुरवणे आदेश देण्यात आले आहे. निविदा अटी व शर्तीनुसार आवश्यकता असल्यास निविदा दराने ५०% जादा परिमाण पुरविणेची अट निविदेमध्ये घेणेत आलेली आहे. यावर्षी जुलै २०१७ पासून जी.एस.टी. कर प्रणाली सुरु झालेने एम.जे.पी. डी.एस.आर. चा दर जी.एस.टी.च्या कर प्रमाणे लागू करून पी.ए.सी. चा दर निश्चत होण्यासाठी बराच कालावधी लागल्यामुळे नवीन कामातील पी.ए.सी. चा दर उशिरा म्हणजेच मे

महिन्याच्या मध्यात प्राप्त झाल्याने निविदा काढण्यास विलंब झालेला आहे. त्याअनुषंगाने सदर कामांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. पावसाळ्यात पाण्याची गढूळता (Turbidity) वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच सदर निविदा कार्यवाही पूर्ण होऊन निविदाधारकांचा पुरवठा आदेश होण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता सद्यस्थितीत, चालू निविदेतील पुरवठा व जलशुद्धीकरण केंद्रातील शिल्लक साठा सदरच्या पावसाळ्यात कमी पडणार आहे. पाऊस लवकर चालू होण्याची शक्यता असल्याने पाण्यातील गढूळता जास्त वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पॉली अल्युमिनियम क्लोराईडचा वापर जास्त होणार आहे. आज रोजी जलशुद्धीकरण केंद्रावर लिक्विड व पावडर पी.ए.सी.चा अनुक्रमे १५० व ४५ मे.टन इतका साठा शिल्लक आहे. मे.एस.व्ही.एस.केमिकल्स कार्पोरेशन व मे.आयडियल केमिकल्स (इं) प्रा.लि. यांच्याकडून संदर्भ क्र.२ व ३ नुसार निविदा दराच्या ५०% वाढीव प्रमाणे लिक्विड पी.ए.सी. पुरवठा घेता येणे शक्य आहे. तूर्तास चालू निविदेतील करारनामा नुसार ठेकेदारांकडून वाढीव २५% पी.ए.सी. लिक़्विड घेण्यात आले आहे. त्यामुळे सदर निविदेतील परिमाणापैकी वाढीव २५% पी.ए.सी. लिक़्विड व वाढीव २५% पी.ए.सी. पावडर घेणे आवश्यक आहे. सदरचा पुरवठा चालू निविदा दराने म्हणजेच दर र.रु.११,९००/- प्रति मे.टन व र.रु.३१,३५०/- प्रति मे.टन अनुक्रमे लिक्विड व पावडर पी.ए.सी. असे देणे ठेकेदारास बंधनकारक आहे. त्यामुळे मनपास निविदेतील दरानेच वाढीव पुरवठा करून घेता येईल. सदर निविदामध्ये मे.एस.व्ही.एस. केमिकल्स कार्पोरेशन व मे. आयडियल केमिकल्स (इं)प्रा.लि यांना दिलेल्या आदेशातील लिक्वीड व पावडर पी.ए.सी.च्या एकूण पुरवठा परिमाणातील आज रोजी अनुक्रमे ७३.१५ मे.टन व १५४ मे.टन पुरवठा ठेकेदाराकडून होणे बाकी आहे. पाण्यामध्ये वाढलेली गढूळता कमी करण्यासाठी चालू निविदेतील मे. एस.व्ही.एस. केमिकल्स कार्पोरेशन व मे. आयडियल केमिकल्स (इं) प्रा.लि यांच्याकडून अनुक्रमे ९२४ व ६१६ मे.टन परिमाणाच्या लिक्वीड पी.ए.सी. २५% वाढीव म्हणजेच अनुक्रमे २३१ मे.टन व १५४ मे.टन इतका वाढीव पुरवठा व पावडर पी.ए.सी. २५% वाढीव म्हणजेच अनुक्रमे ५२ मे.टन व ३४ मे.टन इतका वाढीव पुरवठा करून घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीतील आवश्यकता विचारात घेता याकामाचा आदेश दिलेल्या पुरवठाधारकांकडून त्याचे एकुण परिमाणाच्या लिक्वीड व पावडर पी.ए.सी. २५% जास्त पुरवठा त्याच निविदा दराने करण्यास मान्यता घेणे आवश्यक आहे. १) मे. एस.व्ही.एस. केमिकल्स कार्पोरेशन यांना २५% वाढीव द्रवरुप पॉली अल्युमिनियम क्लोराईड चे परिमाण प्रमाणे (२३१ मे.टन) पुराविणेचा आदेश देणे आवश्यक असल्याने त्यास होणारा एकूण खर्च (२३१ मे.टन X र.रु.११,९००/- प्रति मे.टन = र.रु.२७,४८,९००/- तसेच पावडर पॉली अल्युमिनियम क्लोराईड चे परिमाण प्रमाणे (५२ मे.टन) पुराविणेचा आदेश देणे आवश्यक असल्याने त्यास होणारा एकूण खर्च (५२ मे.टन X र.रु.३१३५०/- प्रति मे.टन = र.रु.१६,३०,२००/- म्हणजेच एकूण र.रु. ४३,७९,१००/- इतका खर्च येत आहे. २) मे. आयडियल केमिकल्स (इं)प्रा.लि यांना २५% वाढीव द्रवरुप पॉली अल्युमिनियम क्लोराईड चे परिमाण प्रमाणे (१५४ मे.टन) पुराविणेचा आदेश देणे आवश्यक असल्याने त्यास होणारा एकूण खर्च (१५४ मे.टन X र.रु. ११,९००/- प्रति मे.टन = र.रु.

१८,३२,६००/- तसेच पावडर पॉली अल्युमिनियम क्लोराईड चे परिमाण प्रमाणे (३४ मे.टन) पुराविणेचा आदेश देणे आवश्यक असल्याने त्यास होणारा एकूण खर्च (३४ मे.टन X र.रु. ३१,३५०/- प्रति मे.टन = र.रु.१०,६५,९००/- म्हणजेच एकूण र.रु.२८,९८,५००/- इतका खर्च येत आहे. ३) मे. एस.व्ही.एस. केमिकल्स कार्पोरेशन व मे. आयडियल केमिकल्स (इं) प्रा. लि. यांना एकूण देयक अन्वये र.रु.७२,७७,६००/- इतका खर्च येत असुन त्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तरी, पाण्यातील गढूळपणा कमी करण्यासाठी द्रवरूप व पावडर स्वरूपातील पी.ए.सी.चा वाढीव २५% पुरवठा घेणेची निकड लक्षात घेता उपरोक्त वरील प्रमाणे २५% वाढीव पुरवठा आदेश संबंधीत ठेकेदारास देणेस व होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९१ विषय क्रमांक - २१

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान विभाग

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मातंवि/७/कावि/५८/२०१८ दि.०८/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाच्या विविध कार्यालयांमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध करणेकरीता मे रिलायन्स कम्युनिकेशन लि., यांना दि.०१ जुलै २०१८ ते दि.३० सप्टेंबर २०१८ अखेर तीन महिनेकरीता मुदतवाढ देणेस व त्याकरीता येणारा खर्च र.रू.२८,७४,७५३/- (अक्षरी र.रू.अठ्ठावीस लाख चौ-याहत्तर हजार सातशे त्रेपन्न फक्त) अधिक कर इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९२ विषय क्रमांक - २२

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – पाणीपुरवठा व जलनि:सारण

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/५/कावि/१०६/२०१८ दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पाणीपुरवठा विभागात कार्यरत कार्यकारी अभियंता श्री तांबे रामदास गणपत यांनी त्यांच्या कार्यालयीन वापराकरिता असलेले विभागाकडील वाहन क्र MH-14/P-5250 (AMBESSEDOR) वारंवार नादुरुस्त होत असलेने पाणीपुरवठा सारख्या अत्यावश्यक सेवेत अडथळे निर्माण होत असल्याचे व नवीन वाहन खरेदी करून मिळावे याकरिता दि ३१/१०/२०१७ रोजी अर्ज दिलेला आहे. सदर वाहन निर्लेखित करणेबाबत कार्यशाळा विभागाकडे अभिप्राय मिळणेकामी प्रस्ताव

पाठविणेत आला होता. दि.११/०४/२०१८ रोजीचे कार्यकारी अभियंता कार्यशाळा यांचेकडील सदर वाहन निर्लेखित करणेबाबत चा अभिप्राय प्राप्त झालेला आहे. सदरील वाहन दि.३०/८/२००० रोजी खरेदी करणेत आलेले असून २,६४,००० किलो मीटर धावसंख्या पूर्ण होत असलेने शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-१०९१-प्र.क्र.विनियम, मुंबई ४०००३२ दि.१/१०/१९९१ अन्वये वेगवेगळी वाहने निरुपयोगी ठरविणे बाबत दिलेले निकष पूर्ण करीत आहे. नवीन वाहन खरेदी शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादित किमतीत खरेदी करणेची कार्यवाही पूर्ण करावी असा कार्यशाळेने अभिप्राय दिलेला आहे. शासनाकडील निर्णयाप्रमाणे वाहन खरेदी किंमत रक्कम रु.६,००,०००/- च्या मर्यादेत करावी लागणार आहे. मा.कार्यकारी अभियंता श्री. तांबे आर.जी. यांचेकडील शेरांकनानुसार विभागाकरीता TATA ZEST XT RT 90 PS BS IV PETROL एकूण किंमत निव्वळ रक्कम रु.५,५८,६४२/-(अक्षरी पाच लाख अठावन्न हजार सहाशे बेचाळीस फक्त) किंवा वाहन डिलीवरी घेते वेळेस देय होणारी किंमत मे.TATA MOTORS लि. मुंबई यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९३ | विषय क्रमांक - २३

दिनांक – १३/०६/२०१८ | विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग

सूचक – मा.यशोदा बोईनवाड | अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.मभां/८/कावि/८३१/२०१८ दि.०८/०६/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक स्टेशनरी/लेखन साहित्य पुरवठा करणेकामी ई.नि.सु.क्र.15/2017-18 अन्वये लघुत्तम निविदाधारक 1) मे सिध्दी कॉपीअर अँन्ड कन्झुमर स्टोअर यांचे आवश्यक स्टेशनरी/लेखन साहित्य एकुण 11 बाबी पुरविणेकामी एकुण र.रु.3,72,210 /- इतके दरलघुत्तम प्राप्त झालेले आहेत. 2) मे कापसे एंटरप्रायजेस यांचे आवश्यक स्टेशनरी/लेखन एकुण 20 बाबी पुरविणेकामी एकुण र.रु.2,27,900/- 3) मे. पर्व मल्टपर्पज वर्क्स सर्व्हिसेस यांचे आवश्यक स्टेशनरी/लेखन बाब क्रं एकुण 8 बाबी एकुण र.रु.1,02,350/- ४) मे.साईकृपा स्वंयरोजगार सेवा सहकारी यांचे आवश्यक स्टेशनरी/लेखनबाब क्रं एकुण 03 बाबी एकुण र.रु.6920/- असे एकुण र.रु.7,09,380/- (अक्षरी र.रु सात लाख नऊ हजार तीनशे ऐंशी फक्त) इतके दर लघुत्तम प्राप्त असुन सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. त्यानुसार तिनही निविदाधारकांना विविध विभागासाठी आवश्यक लेखन/स्टेशनरी साहित्याचा पुरवठा करणेकामी पुवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९४ विषय क्रमांक - २४
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – नगरसचिव विभाग
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/४२८/२०१८ दि.०८/०६/२०१८

मा.नगरसचिव यांची शिफारस विचारात घेऊन –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९५ विषय क्रमांक - २५
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – वैद्यकिय, मुख्यालय
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.वैद्यकिय संचालक यांचे जा.क्र.वैद्य/९/कावि/११५०/२०१८ दि.०६/०६/२०१८

मा. वैद्यकिय संचालक यांची शिफारस विचारात घेऊन –

राज्य शासनाचे आदेशानुसार दर वर्षी प्रमाणे सन २०१७-१८ मध्ये पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २८ जानेवारी २०१८ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेचा व्यापक प्रचार व प्रसिध्दी करणेकामी वैद्यकिय विभागाकडील 'एन.यु.एच.एम.'या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.६३,०००/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ठ हजार फक्त) अगाऊ करण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९६ विषय क्रमांक - २६
दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – वैद्यकिय, मुख्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा. वैद्यकिय संचालक यांचे जा.क्र.वैद्य/९/कावि/११५२/२०१८ दि.०६/०६/२०१८

मा. वैद्यकिय संचालक यांची शिफारस विचारात घेऊन –

राज्य शासनाचे आदेशानुसार दर वर्षी प्रमाणे सन २०१७-१८ मध्ये पल्स पोलिओ लसीकरण मोहिम ११ मार्च २०१८ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिमेचा व्यापक प्रचार व प्रसिध्दी करणेकामी वैद्यकिय विभागाकडील एन.यु.एच.एम. या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे र.रु.४८,०००/- (अक्षरी र.रू.अठ्ठेचाळीस हजार फक्त) अगाऊ करण्यात आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले**

ठराव क्रमांक -२७९७ विषय क्रमांक - २७

दिनांक – १३/०६/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा. सागर आंगोळकर, मा. करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

दि.२०/६/२०१८ रोजी मा. महापालिका सभा असल्याने दि.२०/६/२०१८ ची मा.स्थायी समिती सभा दि.१९/६/२०१८ रोजी दु.२.०० वा. आयोजित करणेत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९८ विषय क्रमांक - २८

दिनांक – १३/०६/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा. राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१०२ दि.१३/४/२०१८ अन्वये झालेल्या ठारावा प्रमाणे प्रभाग क्र.१० मधील कै.सदाशिव बहिरवडे क्रीडांगण शाहूनगर येथील मैदानात असलेली व्यायामशाळा हनुमान स्पोर्टस अकेडमी मोरे वस्ती चिखली या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रू.२०००/- मनपा कडून घेवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७९९ विषय क्रमांक - २९

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र. स्था/नि/ब-मुख्य/३६८/२०१८ दि. ११/६/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 112/2/2017-18 अन्वये प्रभाग क्र.१९ (नविन

भाग क्र.१६) मधील वाल्हेकरवाडी परिसरात नाला बांधणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.कविता एन्टरप्रायजेस नि.र.रू.74,08,457/- (अक्षरी रक्कम रुपये चौ-याहत्तर लाख आठ हजार चारशे सत्ताव्वन्न फक्त) पेक्षा 33.01% कमी र.रू.49,62,925/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०० विषय क्रमांक - ३०

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ब-मुख्य/३६७/२०१८ दि. ११/६/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.112/1/2017-18 अन्वये प्रभाग क्र.२१ मध्ये ठिकठिकाणी नाले बांधणेकामी मे.कविता एन्टरप्रायजेस नि.र.रू.75,13,341/- (अक्षरी रक्कम पंच्याहत्तर लाख तेरा हजार तीनशे एक्केचाळीस फक्त)पेक्षा 33.11% कमी र.रू 50,25,674/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०१ विषय क्रमांक - ३१

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/EWSप्र/३९५/२०१८ दि. ११/६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मौजे च-होली येथील नविन स.नं.४०८पै, ४०९ पै (आरक्षणक्र.२/८३) येथे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरकुल योजना राबविणेचे काम चालू आहे. सदर प्रकल्प महाराष्ट्र शासन. गृहनिर्माण विभागाच्या प्रस्तावात नमूद प्रमाणे अधिसूचना अन्वये महारेरा अंतर्गत रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. त्याअंतर्गत सदर अधिसूचनेमधील नियम ३(५) नुसार र.रू.१०/- प्रति चौ.मीटर याप्रमाणे २१५०० चौ.मीटर इतक्या क्षेत्राकरिता एकूण र.रू.२,१५,०००/- (अक्षरी र.रू.दोन लाख पंधरा हजार फक्त) इतकी रक्कम रजिस्ट्रेशन फी म्हणून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

व सदरची रक्कम लेखाशिर्ष क्र.१४ प्रधानमंत्री आवास योजना अ.क्र.१३ (पान क्र.५२८) इतर फी मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०२ विषय क्रमांक - ३२

दिनांक – १३/०६/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिकणा-या सर्व गुणवंत विद्यार्थांना माध्यमिक विभागाकडून सन २००८-२००९ पासून इयत्ता १० वी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थांना अर्थ सहाय्य र.रू.१,००,०००/- इयत्ता १० वी मध्ये ८५% ते ८९.९९% गुण मिळविलेल्या विद्यार्थांना अर्थ सहाय्य र.रू.५०,०००/- इयत्ता १० वी मध्ये ८०% ते ८४.९९% गुण मिळविलेल्या विद्यार्थांना अर्थ सहाय्य र.रू.२५,०००/- दरवर्षी दिले जातात त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी शाळेमध्ये शिकणा-या **दारिद्रय रेषेखालील विद्यार्थांना** मात्र वरील प्रमाणे इयत्ता १० वी मध्ये ९०% पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थांना अर्थसहाय्य र.रू.१,००,०००/- इयत्ता १० वी मध्ये ८५% ते ८९.९९% गुण मिळविलेल्या विद्यार्थांना अर्थसहाय्य र.रू.५०,०००/- इयत्ता १० वी मध्ये ८०% ते ८४.९९% गुण मिळविलेल्या विद्यार्थांना अर्थसहाय्य र.रू.२५,०००/- दरवर्षी अनुदान देणेकामी या वर्षापासून म्हणजेच सन २०१८ साली पास झालेल्या गुणवंत विद्यार्थांनाही बक्षिस रक्कम देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीकामी नागरवस्ती किंवा माध्यमिक शिक्षण विभागाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव प्रमाणे कार्यवाही करावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०३ विषय क्रमांक - ३३

दिनांक – १३/०६/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.यशोदा बोईनवाड यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने शहरामध्ये विविध ठिकाणी उड्डाणपुल बांधण्यात आले आहेत. तसेच महापालिकेच्या अनेक मिळकती आहेत. त्या सर्वांवर अनधिकृतपणे विविध प्रकारच्या जाहिराती चिटकवणे व रंगविणे असा प्रकार सर्रासपणे होत असल्याचे वारंवार दिसून येते. त्यामुळे सुंदर शहराचे विद्रुपीकरण झाले आहे. पिंपरी चिंचवड

शहरामध्ये विविध ठिकाणी उड्डाणपुल आहेत. त्या उड्डाणपुलाच्या खांब (पिलर) वरती जाहिरातींचे (पोस्टर, स्टिकर, पेम्प्लेट) चिटकविले आहेत. अशा प्रकारच्या अनाधिकृतरित्या चिटकविलेल्या रंगविलेल्या जाहिरातींचे आठ दिवसात सर्व्हेक्षण करुन त्या संबंधितांवर गुन्हे दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०४ विषय क्रमांक - ३४

दिनांक – १३/०६/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा. विलास मडिगेरी

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव.

मा.स्थायी समिती ठराव क्र.२५४७, दि.११/०४/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. “पिंपळे गुरव येथील आरक्षण क्रमांक ३४७ हा मजकूर वगळून त्या ऐवजी आरक्षण क्रमांक ३४४ व ३४४ अ असा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.” सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव प्रमाणे कार्यवाही करावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०५ विषय क्रमांक - ३५

दिनांक – १३/०६/२०१८

सूचक – मा. विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, ताथवडे, रावेत, वाकड, पुनावळे, मामुर्डी, किवळे इ. या भागामध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे बांधकामाचे मोठे गृहप्रकल्प (स्किम) उभे राहत आहेत. नव्याने अर्ज दाखल होणा-या गृहप्रकल्पांना काही काळ (Temporary Period) बांधकाम परवाना न देण्यास मान्यता देणेत येत आहे त्याचप्रमाणे पावसाळा सुरू झाला असुन पावसाचे प्रमाण सध्या कमी आहे. त्यामुळे होणा-या पावसाचे प्रमाण व धरणातील पाणीसाठा विचारात घेवून त्यानंतर पूर्ववत बांधकाम परवानगी देण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०६ विषय क्रमांक - ३६

दिनांक – १३/०६/२०१८

सूचक – मा. राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

महापालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी शालेय साहित्य देण्याची प्रशासनाने दक्षता घेणेस व विलंब होणार नाही याची काळजी घेवून कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२८०७ विषय क्रमांक - ३७

दिनांक – १३/०६/२०१८ विभाग – भूमि आणि जिंदगी

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.भूजी/ट्रेसर-८/कावी/१२२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्त कार्यालयाकरीता मनपा मालकीची चिंचवड येथील स.नं.१६५ व १६६ सि.स.नं.३२५० मधील आ.क्र.१९४ येथील प्रेमलोक पार्क शाळा इमारत भाडयाने मिळणेबाबत मा.पोलीस आयुक्त यांनी दि.०८/०५/२०१८ अन्वये मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर शाळा इमारत

G + 2 तळमजला + दोन मजले,

भुखंडाचे क्षेत्रफळ एकूण ४४२७.५० चौ.मी.,

तळमजला ७६१.८४ चौ.मी.,

पहिला मजला ७३१.२९ चौ.मी.,

दुसरा मजला ७१२.०० चौ.मी.,

शाळेसमोरील मोकळया मैदानाचे क्षेत्रफळ ३६६५.१६ चौ.मी.,

प्रत्येक मजल्यावर ७ वर्ग खोल्या आहेत व एक सभागह आहे.

सबब पोलीस आयुक्त कार्यालयास पिं.चिं.मनपा नियम/अटीशर्ती नुसार चिंचवड येथील प्रेमलोक पार्क शाळा इमारतीची जागा भाड्याने देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/७७१/२०१८
दिनांक - १४/०६/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.उद्यान/६/कावि/६७६/२०१८, दि.३१/०५/२०१८ विषय क्र.६ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. उद्यान विभाग
क्रमांक:-उद्यान/६/कावि/६७६/२०१८
दिनांक :-३१/०५/२०१८

प्रपत्र अ

निविदा कार्यवाही पुर्ण झालेने मा.स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर

| अ क्र | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा तारीख | आदेश क्रमांक | आदेशाचा दिनांक | निविदा र,रु. | स्विकृती दर | निविदा खर्चाची मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. दिंवगत महापौर मधुकर पवळेस्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या | ६/६/२०१७-१८ | वाहतुकनगरी उद्यान देखभाल | २६/०३/२०१८ | उद्यान/६/कावि/३८९/२०१८ | ३१/०३/२०१८ | ७,३५,६००/- | २७.९८ % कमी | ५,२९,७७९/- |
| २ | मे. कल्याण स्वंय रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या | ६/१२/२०१७-१८ | छत्रपती शिवाजी महाराज उद्यान ( मधुबन सोसायटी) देखभाल | २८/०२/२०१८ | उद्यान/६/कावि/३८८/२०१८ | ०१/०३/२०१८ | १७,६५,४४०/- | २६.७० % कमी | १२,९४,०६७/- |
| ३ | मे.लक्ष्मी फ्लॉवर अँण्ड डेकोरेशन | १९/१/२०१७-१८ | मनपाचे विविध कार्यक्रमासाठी हार फुले, पुष्पगुच्छ व नारळ इत्यादी साहित्य पुरविणे | २८/०३/२०१७ | उद्यान/६/कावि/३९०/२०१८ | ३१/०३/२०१८ | २४,००,५००/- | ११.४३% कमी | २१,२६,१२२/- |
| ४ | मे. संस्कृती महिला स्वंय रोजगार संस्था | ९/४/२०१७-१८ | आयुर्वेदिक वनोषधी उद्यान देखभाल | १९/०५/२०१८ | उद्यान/६/कावि/६६३/२०१८ | ०१/०६/२०१८ | ६,०९,६००/- | २९.०० % कमी | ४,३२,८१६/- |

५५१११४०/- ~~३८,५३,००५/-~~ ४३८२७८४/-

अति आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८



(८)